DR. Sawant



UGC A...
Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL 4 NO 1 JAN. 2018
A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL


**SPECIAL ISSUE**

On the Occasion of One Day National Conference On

## WOMEN EMPOWERMENT IN ANCIENT TO MODERN PERIOD

27th January, 2018

(Book I)



*Editor*

ORGANIZED BY

VOL. 4 | ISSUE 1 | JANUARY 2018 (UGC Approved Journal No. 63716) Impact Factor: 4.197 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

(BOOK I)

Special Issue on the Occasion of National Conference on

**Women Empowerment in Ancient to Modern Period**

(27 January, 2018)

Organized by

**Shikshan Maharshi Dnyandeo Mohekar Mahavidyalaya**

**Kalamb, Dist. Osmanabad**

**Mr. Pawde K. W.**
Editor

**Dr. Ashokrao Mohekar**
Principal

MGEW SOCIETY'S

CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES

KALYAN (MAHARASHTRA)

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

# CONTENTS

1. प्राचीन ते आधुनिक काळातील महिला सबलीकरण / डॉ. गोविंद देशमुख |7
2. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी आणि स्त्री सबलीकरण /प्रा. डॉ. रामभाऊ मुटकुळे |11
3. सातवाहन राज्यकर्त्यांचा स्त्री देवतांविषयक दृष्टीकोन / डॉ.भेलोंडे जगदिश व्यंकटराव |13
4. समाज सुधारक आणि महिलांचे सबलीकरण / डॉ.शिवाजी सोमला पवार |15
5. फातीमा बेगम : भारतातील पहिल्या महिला चित्रपट दिग्दर्शिका / प्रा.हमीद उमरअली काझी |19
6. Satyakka's contribution to Vachana Literature / Dr. Nalini Avinash Waghmare |23
7. Contribution of Revolutionary Women in Indian History / Dr. Kamble R.S. |26
8. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत कातीकारी स्त्रीयांचे योगदान / डॉ. आर. आर. पिपंळपल्ले |28
9. भारतीय ऐतिहासिक परिप्रेक्षातील कर्तृत्वान स्त्रियां : एक आढावा / प्राचार्य डॉ. बबन पवार |31
10. प्राचीनवाङ्मय आणि स्त्रीभ्रुणहत्या / प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के |33
11. हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यात गोदावरीबाई टेके व दगडाबाई शेळके यांचे योगदान / प्रा. डॉ. अंगद पवार |35
12. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. आर. एस. पारवे |39
13. हमीद दलवाई – मुस्लिम स्त्री चळवळ / प्रा.वाईकर एस.बी |42
14. तथागत गौतम बुद्धांची स्त्रिविषयक भूमिका / प्रा. डॉ. डी. पी. हिंगमिरे |45
15. शैक्षणिक धोरण आणि महिला सबलीकरण / डॉ.विलास जाधव & प्रा.वाय.डब्ल्यू.शेख |48
16. महिला सबली करणासाठी पं.रमाबाईचे योगदान / डॉ.नंदकुमार ज्ञानोबा जाधव |50
17. ज्ञानोदय आणि विधवा पुर्नविवाह चळवळ (इ.स.१८५१-१८६१) / डॉ.उत्तम पठारे |53
18. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत मराठवाड्यातील महिलांचे योगदान / डॉ. नरेंद्र देशमुख |57
19. स्त्री पुरुष समानतेच्या पुरस्कर्त्या : ताराबाई शिंदे / डॉ. भालेराव जी पी |59
20. हैद्राबाद मुक्ती आंदोलानातील माहितीचे योगदान / प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव |61
21. हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग / डॉ.किशन केंद्रे |63
22. प्रबोधनकालीन स्त्रीयांचे शैक्षणिक उत्थान / डॉ. मोरे डी. ए. |68
23. स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग / डॉ. पी.बी. सिरसट |70
24. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / डॉ. एच.टी. सातपुते |72
25. प्राचीन ते आधुनिक काळातील कर्तृत्वान स्त्रिया / प्रा.सविता तुकाराम तावडे |75
26. स्वातंत्र्यलढयातील महिलाचा सहभाग / डॉ. दत्ता उध्दव जाधव |78
27. धाडसी व्यक्तिमत्व गोदावरीबाई टेके / प्रा.डॉ. बाबजे मंजुषा मुकुंदराव |82
28. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री-विषयक विचार / डॉ. सुनिल शिवमूर्ती रजपूत |84
29. भारतीय स्वातंत्र्य लढयातील कस्तुरबा गांधीची भूमिका / प्रा.दिनकर मोहनराव रणदिवे |86
30. हैदराबाद मुक्ती संग्रमामध्ये दगडाबाई शेळकेचे योगदान / प्रा.डॉ. विजया साखरे |88
31. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे शिक्षणाच्या माध्यमातून महिला सबलीकरणाचे प्रयत्न / गडगे शांता रंगनाथ |91
32. Empowerment of muslim women and law. / Dr.ShaikhHussain Imam |94
33. साताराच्या प्रतिसरकारमधील एक स्वातंत्र्य सेनानी राजमती पाटील यांचे कार्य / प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम |98
34. प्रशासकीय धोरण आणि महिला सबलीकरण / प्रा. डॉ. घोलप कमलाकर गोरख |101
35. हैदराबाद मुक्ती लढ्यातील बीड जिल्ह्यातील महिलांचा राजकीय सहभाग. / प्रा.डॉ.सावंत के.डी. |104

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

## 35.

# हैदराबाद मुक्ती लढ्यातील बीड जिल्ह्यातील महिलांचा राजकीय सहभाग.

**प्रा.डॉ.सावंत के.डी.**
(इतिहास विभाग प्रमुख)
महिला महाविद्यालय, गेवराई.

प्रस्तावना : इंग्रज सत्तेच्या काळात भारतात जवळपास ५६३ देशी राज्य आणि संस्थानेहोती. या राज्याचा आणि संस्थानाचा कारभार देशी राजे व संस्थानिक पाहत असत.दक्षिण भारतात त्रावणकोर बडोदा. कोलपूर नागपूर आणि हैदराबाद ही राज्य होती.यामध्ये हैदराबादचे राज्य आकराने दुसऱ्या क्रमांकाचेहोते.म्हणूनते महत्त्वाचे होते.मोगल बादशाह ओरंगजेब दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी मरण पावला.``त्यांच्यानंतर सत्तेवर आलेले मोगलसम्राट दुर्बल व कर्तुत्वहीन निघाले.याचाच फायदा घेऊन दक्षिणेचा सुभेदार मीर कमरूद्दीन चिनकुलीचखान निजाम उल मुल्क याने इ.स.१७२४ मध्ये दक्षिणेत हैदराबाद स्वतंत्र्य राज्याची स्थापना केली.[१]`` या राज्याच्या गादीवर वंशपरंपेरेने होऊन गेलेल्या सत्ताधीशांना `निजाम` व `आसफजाह` या नावाने ओळखले जात असे.हैदराबाद राज्यात मराठवाडा, तेलंगणा व कर्नाटक या प्रादेशिक विभागाचा समावेश होता.

इ.स.१९११ ते इ.स.१९४८ या काळात सातवा निजाम म्हणून नवाब मीर उस्मान अलीखानहा निजाम इ ाला.त्याचा सुरूवातीचा शासनकाळ चांगला होता.परंतु इ.स.१९१६ नंतरत्याचे शासन म्हणजे एकतंत्री. लहरी. अनियंत्रित होते.हा इतर निजामांच्या तुलनेत अनेक बाबतीत वेगळा होता.[२] त्याच्याच काळात रझाकरसंघटनेनेहिंदू जनतेवर अन्याय अत्याचार करण्यास सुरू केल्याचे दिसते.त्याचाच परिपाक म्हणून हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामत निजाम विरोधी वातावरण तयारहोऊन अनेक लढे उभे राहिले.मराठवाडा विभागतही निजाम विरोधी लढ्यात सुरूवात झाली.

परंतु बीड जिल्ह्यात इ.स.१९३७ पर्यंत लढ्याचे लोण पसरलेले नव्हते.बीड जिल्ह्यातील हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याच्या संदर्भात पुरूषोत्तम चपळगावकर म्हणतात, ``इ.स.१९३६ - १९३७ पर्यंत बीड जिल्ह्यात राजकीय पक्षच अस्तित्वात नव्हता.[३]`` यावरून हैदराबाद स्वातंत्र्य लढ्याचे लोन बीड जिल्ह्यात इ.स.१९३८ नंतरसुरू झाले.हा लढा पुरूष व महिलांनी सक्रिय व्यापक. सखोल आणि दुरगामी स्वरूपाचा बनविला.विशेषकरून बीड जिल्ह्यातील महिलांच्यासक्रिय सहभागामुळे निजामाला व रझाकारसंघटनेलाशह बसून मराठवाडा निजामाच्या वर्चस्यातून मुक्तकरण्यासाठी हातभार लागला.अशा या संघर्षाचा व कार्याचा इतिहास अभ्यासकासमोर यावा हा या शोध निबंधाचा उद्देश आहे.

हैदराबाद मुक्तीसंग्रामात मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यातून महिलांच्या चळवळीस चांगली गती मिळाली.प्रामुख्याने अत्यंत मागासलेल्या अशा बीड जिल्ह्यातून महिलांच्या जागृतीस चांगला प्रतिसाद मिळाला आणि या जिल्ह्यातून प्रत्यक्ष संघर्षात महिला गर्तीने सहभागी झाल्या.समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रियांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात या लढ्यात सहभाग घडून आला.त्यामुळेहा लोकलढा अधिक व्यापक होऊ शकला.बीड जिल्ह्यातील बिंदूसरेचे पाणीतर क्रांतीला अधिक तेजस्वी धार देणारेहोते.बीड जिल्ह्यातील या लढ्यात खालील महिलांनीसक्रीय सहभाग घेऊन मराठवाड्याला निजामाच्या जोखडातून मुक्त केले.

**श्रीमती अनुसया जाधव :** बीडचे स्वातंत्र्य सेनानी काशिनाथराव जाधव यांच्या त्या पत्नीहोत.अनुसया जाधव यांनी या भागातील महिलांनासंघटीत करून त्यांना लढ्यामध्ये भाग घेण्यासाठी प्रेरणा दिली. त्या स्वतः या संघटन कार्यात सदैव आघाडीवर होत्या. त्या म्हणतात `बीडला जेंव्हा महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन जेंव्हा भरले तेंव्हा रोहिले व रझाकर अडथळा आणतील असे वाटत होते.` पण भारी जनसमुदायपाहूनत्यांचीहिंमत झाली नसावी. जेवणाची व्यवस्था केली. अधिवेशन पार पाडले.त्या दिवसापासून काशिनाथराव जाधव यांची भ्रमती सुरू झाली.कधी ह्या गावाला तर कधी त्या गावाला अशा त्यांच्या सभा होऊ लागल्या.अधिवेशन होऊ लागले.मीही काही अधिवेशनला त्यांच्या सोबत जात असे.तिथे आम्हाला सांगितलेली कामे आम्ही आनंदाने करीत असू.हे कार्य चालु असतांना वरून कॉंग्रेस पुढाऱ्यांचा आदेशआला; भूमिगत राहून काम करा.तेंव्हा काशिनाथ जाधव भूमगत झाले.त्यांचे गुप्त वेशातील मित्र आले.म्हणजेत्यांची जेवणाची व्यवस्था करावी लागे.कधी कधी मीहीवेश पालटून त्यांना हवी असलेली माहिती पुरवायचे, जेवण पोहाचायचे[४], यावरून महिलांनात्याकाळात अनेकजोखीमिची कामे कशी करावे लागत असत याची प्रचिती येते.

**श्रीमती पार्वतीबाई रामलिंग स्वामी :** यांचे कार्यमहिलांना प्रोत्साहित करण्याचेठरले.त्यांनी बीड भागात महिलांत जागृती निर्माण करून निजाम व रझाकरसंघटना कशी अन्याय अत्याचार करते याविषयी समाजात जागृती केली.

श्रीमती आनंदीबाई नारायण जोशी : यांचे [illegible] [illegible] आहे.त्यांनी [illegible]

ISSN: 2454-5503
Impact Factor: 4.197 (IIJIF)

बीड भागात महिलांच्या संघटनासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.असेसंघटन करतांना अनेकविध उपक्रम आखूनतयांनीहा लढा तळागळातील महिलापर्यंत नेऊन पोहोचविला.

**श्रीमती सुलोचनाबाई ऊर्फ भाई खेडगीकर :**

हया स्वामी रामानंदतीर्थ यांच्या भावजाई होत.यांनी महिलांच्या चहवळीस बीड जिल्ह्यात उत्तम प्रकारची पार्श्वभूमी तयार केली.स्वामी रामानंदतीर्थ यांचेसारे कुटुंब हे अंबाजोगाई नगरीशी निगडीतहोते.त्यांचे बंधू बेथूजी गुरूजी यांच्या प्रमाणेच स्वामीजींच्या भगीनीनेही लढ्यातील गुप्तसंदेश पोहोचविण्याचे महत्तवाचे कार्य केले.

**श्रीमती मुंगीकर लक्ष्मीबाई दत्तात्रय :** या ता.आष्टी जि. बीड येथीलहोत.यांनी महिला मंडळात स्वातंत्र्य चळवळीचा प्रचार केला.भूमिगतांना गुप्तपणेअन्न, निवारा दिला. त्यांच्यासाठी अन्न वस्त्र गोळा केले.[५]

**श्रीमती लिलाबाई नरहर कुलकर्णी :** जन्म १९३०, जन्मगाव तेलसंग, ता. आष्टी जि. बीड; शिक्षण प्राथमिक, स्वातंत्र्य सेनिक जेभूमिगत होते. त्यांच्या खाण्यापिण्याच्या व राहण्याच्या सोई केल्या.महिला मंडळस्थापून महिलांत जागृती करण्याचे कार्य केले.सत्याग्रही व शिक्षा झालेल्या सैनिकांची खाण्यापिण्याचीसोय व सुश्रूषा केली. शासनाकडून सन्मानपत्राने त्यांना सन्मानित करण्यात आले.[६]

**श्रीमती हिरा राख :** जन्म १९१३ मुळगाव थेरला ता.पाटोदा जि. बीड यांनी १९४७ सालीसत्याग्रह केला.त्याबद्दल त्यांना डिफेन्स ॲक्टखालीसहा महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली.[७]

**श्रीमती शांताबाई कोटेचा :** यांनी बीड जिल्ह्यातून मुक्ती संग्रामात सहभाग नोंदविला.खादीचा प्रसार आणि प्रचार करूनसंग्रामासाठी निधी गोळा करणे. जनजागृतीची कामे करणे, पत्रके वाटणे असे अनेक कार्यत्यांनी केले. सन १९४१ मध्ये उमरी येथे झालेल्या महाराष्ट्र परिषद अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. शांताबाई यांनी गावोगावी जाऊन महिलांचे प्रबोधन करण्यो कार्य केले.[८]

**श्रीमती सरस्वती येळंबकर :** यांनी बीड जिल्ह्यातून हैदराबाद मुक्तीसंग्रामात हिरारीने राजकीय सहभाग नोंदविला.त्यांनी जनजागृतीचे व पत्रके वाटणे असे कार्य केले.[९]

वरिल सर्व महिलांनी हैदराबाद मुक्ती संग्रामात सक्रीय सहभाग नोंदविला तसेच अज्ञात शेकडो महिलांनीहीसक्रीय सहभाग नोंदवून मराठवाडा दि. १७ सप्टेंबर १५४८ रोजी निजाम मुक्त केला.

**सारांश :** बीड जिल्ह्यातील पुरूषांच्या सहभागा इतकाच महिलांचा सहभाग महत्त्वाचा राहिला.बीड जिल्ह्यातील महिला शक्तीने आपले शौर्य, धैर्य, साहस, संघटन कौशल्य इत्यादी दाखवून या लढ्यालासखोल व्यापक सखोल आणि दूरगामी स्वरूपाचा बनविला.कदाचित या लढ्यात भाग घेण्याऱ्या महिलांची संख्या कमी असेल परंतु या लढ्यातील महिलांनी दिलेले योगदानत्यामुळे गौणठरत नाही.अखिल भारतीय पातळीवरील स्वातंत्र्य आंदोलनात जितका महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण होता.तितकाच या हैदराबाद मुक्ती लढ्यातील बीड जिल्ह्यातील महिलांचा सहभाग देखील महत्त्वपूर्ण आणि अनमोल राहिल्याचे दिसते.

**संदर्भ सूची :**

१. संशोधक, त्रैमासिक पत्रिका, वर्ष - ७३, अंक- ३, राजवाडे संशोधक मंडळ, धुळे, २००५, पृष्ठ २१.
२. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संगाम आणि मराठवाडा, मोजे प्रकाशन गृह, मुंबई, २००१, पृष्ठ ३७.
३. अपर्सिंगेकर विनोद, मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव, विशेषांक, औरंगाबाद, १९९८, पृष्ठ ५.
४. टाकसाळ मनोहर व नाईकवाडे ज्ञानोबा, (संपा) बिंदुसरेचे पाणी, काशिनाथराव जाधव गौरव ग्रंथ समिती, बीड,१९८३, पृष्ठ १०२.
५. डॉ.कुंटेभ.ग., स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९७६, पृष्ठ ४३९.
६. कित्ता, पृष्ठ५५.
७. कित्ता, पृष्ठ३१७.
८. डॉ. ढेकणे के.डी., (संपा), महाराष्ट्रातील स्वातंत्र्य चळवळी, जनरल्स, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती दि. १८ मार्च २०१५, पृष्ठ ३२,३३.
९. अपर्सिंगेकर विनोद, मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव, विशेषांक, उपरोक्त, पृष्ठ ७८.

❑❑❑